| | |
|---|---|
| MHSO200013352023 | **नियमीत दिवाणी दावा नं.३६७/२०२३**<br>(राजेंद्र येलपले वि. अशोक काटे) |

## नि. १४ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विनाकैफियतीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादीस फेब्रुवारी २०२४ मध्ये समन्सची बजावणी झाली. त्यानंतर प्रतिवादीने ३० दिवसाच्या आत कैफियत देणे जरुरीची होते. परंतु, प्रतिवादी हे वृध्द असून त्यास वयोमानपरत्वे आजार झालेला असून प्रतिवादीची दृष्टी व ऐकण्याची क्षमता कमी झाल्यामुळे प्रतिवादीस दाव्यासंदर्भातील सर्व माहिती गोळा करण्यात बँकेमध्ये जाऊन त्याचे खाते उतारे व तपशील मिळवणेसाठी बराच कालावधी लागला. यानंतर प्रतिवादीस एकटयाने पुणे ते सांगोला प्रवास करणे शक्य नसलेने प्रतिवादीस सांगोला येथे येण्यासाठी काही काळ थांबावे लागले. या सर्व प्रकारामुळे प्रतिवादीकडून मुदतीत कैफियत देणेस हयगय झाली. त्यामुळे प्रतिवादी यांच्याविरुध्द विनाकैफियतीचा आदेश झालेला आहे.

३. दावा स्थावर मिळकतीसंबंधीचा आहे. प्रतिवादीचे मौल्यवान हक्क याकामी गुंतलेले आहेत. त्यामुळे प्रतिवादीला याकामी कैफियत देण्याची व त्याची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द होऊन त्यांनी सोबत दिलेली दाव्याची कैफियत स्विकारण्यात यावी, अशी

विनंती केली आहे.

**४.** वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, प्रतिवादी यांनी दिलेली कारणे खोटी व बेकायदेशीर अशी आहे. यात दिलेली कारणे परस्परविरोधी अशी आहेत. कैफियत देण्याचा या कारणांशी काही संबंध वाटत नाही. सबब, अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**५.** प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना ०९/०२/२०२४ रोजी समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी हे दिनांक १९/०३/२०२४ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. परंतु, त्यांनी मुदतीत कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द विनाकैफियतीचा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. प्रतिवादीने विलंबाबाबत अर्जात नमूद असलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु, सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे. तरी दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असल्याने प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे, दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.१५ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, त्यांचेविरुध्द झालेला

विनाकैफियत आदेश रद्द करणे व त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.१४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांना नि.क्र.१२ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

PATIL ARTEE ASHOKRAO
Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2025.07.17 17:02:08 +0530

(**श्रीमती ए.ए.पाटील**)

दि. १७/०७/२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | Smt. S.S.Kolekar |
| **(b)** | Court | **:-** | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 17/07/2025 |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 17/07/2025 |